## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ७२६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/१०/२०१७

**१) मुलीला लग्नाचे आमिष दाखवुन अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

जानेवारी २०१७ ते एप्रील २०१७ पर्यत यातील आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आमिष देवुन तिचेशी वेळोवेळी जबरीने अत्याचार केला तसेच फिर्यादीला धमकी देवुन कोणाला काहीही सांगितले तर तिचे आई वडीलास जिवाने मारण्याची धमकी दिली, व आरोपीने फिर्यादी सोबत वेळोवेळी बळजबरीने शारिरीक अत्याचार केल्याने ६ महीण्याची गर्भधारणा झाली असल्याने फिर्यादींचे तोंडी व रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७६(२)(एन),४१७,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चकाटे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २१/१०/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील रेंगेपार कोटा गावातील ईलेक्ट्रीक लाईन खंडीत झाल्याने म.रा.वि.वि.कंपनीचे तंत्रई (लाईनमेन) हे रोहीत्र डि. पी. चे फेस चेक करीत असतांनी यातील आरोपी हा फिर्यादी कडे जावुन लाईन का बंद आहे? विचारुन त्यांना अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन त्याचे डावे गालावर २ थापड मारुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३५३,३३२,५०४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. हेमणे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) मोटार पंपाची चोरी. :–**

दिनांक २२/१०/२०१७ चे १५.०० ते २३/१०/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी राजेन्द्र पतीरामजी हटवार वय ४० वर्ष, रा. परसोडी ता. जि. भंडारा हा शेताजवळील नाल्यावर पिकास पाणी देण्याकरीता लावलेली पानबुडी मोटार पंप किंमती १०,१००/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जांभुळकर पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) मोटार पंप व प्लॉस्टीक पाईपची चोरी :–**

दिनांक २२/१०/२०१७ चे १८.०० ते २३/१०/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी गोपाल शिवा उईके वय ४५ वर्ष, रा. खांबा जांभळी याने शेताला पाणी देण्याकरीता नाल्यावर लावलेली १.५ एचपी सीआरआय कंपनीची मोटार पंप किंमती ४,०००/–रु. व काळया रंगाचा प्लॉस्टीक पाईप ३५० फुट किंमती १,०००/–रु. असा एकुण ५,०००/–रु. चा माल काणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन पाहुण कापुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जांभुळकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) अनोळखी आरोपी ईसमाने नाकातोंडाला रुमाल लावुन बेहोश करुन टवेरा गाडीत टाकुण नेल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २२/१०/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी योगेश्वर भिवाजी चकोले वय २२ वर्ष, रा. मोहगाव देवी हा आपली लोहा सिमेंटची दुकान उघडण्यास पारडी फाटा येथे आला व दुकाना समोर रोडवर ऊभा असतांना यातील ३ अनोळखी आरोपी ईसमांनी चेहरे कापडाने अर्धवट बांधलेले ईसम फिर्यादीचे दुकानाचे समोर रोडवर येवुन त्यातील १ अनोळखी आरोपी ईसमाने मागेहुन फिर्यादीचे नाकातोंडाला रुमाल लावुन बेहोश करुन टवेरा गाडीत टाकुण पळवुन नेल्याने फिर्यादींने आज रोजी तोडी तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३६५,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**५) ट्रॅंकरच्या धडकेत महिला जखमी :-**

दिनांक २३/१०/२०१७ चे १६.४० वाजता दरम्यान यातील जखमी अनोळखी पागल बाई वय अंदाजे ६५ वर्ष ही खरबी गावातुन डांबरी रोडवर जात असता भंडारा मोहाडी कडुन तुमसर कडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील टॅंकर हयगयीने, निष्काळजीपणे चालवित आणुन अनोळखी पागल बाईस धडक मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादी कर्तीकस्वामी योगराजरामा वंजारी वय २१ वर्ष, रा. खरबी यांचे तोडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४,१३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**६) जंगल शिवारात इसमाचा प्रेत मिळुन आले :-**

दिनांक २३/१०/२०१७ चे ०९.०० ते १६.०० वाजता दरम्यान यातील मृतक चिंधु मारोती भुरे वय ५० वर्ष, रा. मकरधोकडा हा नेहमी प्रमाणे घरुन मासोळया पकडण्याचे जाळ घेवुन गेला असतांना मृतकाचे प्रेत मकरधोकड जंगल शिवारात वैनगंगा नदीकडे जाणाऱ्या पायवाटेजवळ मिळुन आल्याने फिर्यादी अरुण शंकर भुरे वय ३० वर्ष, रा. मकरधोकडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेश्राम पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**७) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक २२/०९/२०१७ चे ०३.४५ वाजता दरम्यान यातील मृतक महेश राजकुमार मेश्राम वय ३२ वर्ष, रा. सोनेगाव हा घटनास्थळी पेंटीगचे काम करीत असतांना घोडीवरुन उतरत असतांना घोडीवरुन उतरत असतांना संतुलन बिघडल्याने खाली पडला त्याचे डोक्याला, छातीला मुका मार लागला असता त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे प्रथमोउपचार करुन नंतर मेडीकल कॉलेज नागुपर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक ०६/१०/२०१७ चे ०३.१५ वा. दर. मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाने प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कावळे. पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

८) अवैध दारू अंडयावर धाडी . :–

दिनांक २३/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, करडी, पवनी व लाखांदुर येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून २५ लिटर हातभट्टी दारू किंमती २५००/–रु, ७८७ लिटर ५०० मिली लिटर देशी + १ टाटा सुमो गाडी किंमती ३,२७,५००/–रु. चा माल असा एकुण किंमती ३,३०,०००/–रु. जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :

दिनांक २३/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५९ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.